**नियमीत फौजदारी प्रकरण क्र.६६/२०२०**

शासन–विरुध्द–अब्दुल

निशाणी क्र. १८

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी –**

**मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव –संतोष मधुकर पुल्लरवार

वय –४१ वर्षे, कामधंदा –शेती,

राहणार–सुमठाणा, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे स.शा.अ. श्री. एस.आर.ठावरी यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

०१. दि.२५/०२/२०२० रोजी १६.०० वाजताचे दरम्यान चंद्रपूर नागपूर हायवेवर एन.टी.पी.सी.जवळ पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलविले होते. तीन म्हशी अपघातामध्ये मरण पावल्या होत्या, म्हणून मला पंचनाम्याकामी बोलविले होते. मला दाखविण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी माझे समक्ष तयार केला होता व त्यावर मी वाचून समजुन सही केली हाेती. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. मी मोक्यावर त्या म्हशींना बघीतले होते. दोन म्हशी पडून होत्या, त्यांच्या पायाला, पोटाला लागले होते, एका म्हशीची शिंग तुटलेले होते आणि एका म्हशीचे पोट फाटले होते, तेथे वाहन वगैरे मला दिसले नाही.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी तर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.के.बी.धोटे यांच्या मार्फत–**

हे खरे आहे की, पंचनामा चालू असतांना मी येत होतो, पोलीसांनी मला सही करण्यास सांगितले म्हणून मी तेथे गेलो. हे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यात काय लिहीले हे मला माहित नाही. हे खरे नाही की, माझ्या समक्ष कुठलाही घटनास्थळ पंचनामा झाला नाही. हे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास–पुर्ण.**

**फेर तपास–नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत, समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.05.07 16:47:57 +0530

दिनांकः– ०७/०५/२०२६

**(ए.एस. जरुदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती